

# ग्राफिक डिझाईन स्किल्स

## माहिती-पत्रक

Graphic Design Skills : Prospectus

# G. D. Skills : Course Structure



# G. D. Skills : Course Material

- CorelDraw or Illustrator
- Photoshop
- Laptop
- Camera
- Pencil & Sketch Pad








# Graphic Design Media

## PRINT DESIGN

- Advertising
- Offset Printing
- Screen Printing
- Flexo Printing
- Roto Printing
- Digital Printing

## WEB DESIGN

- Domain & Hosting
- HTML / CSS / JS
- Bootstrap
- Wordpress
- Blogging
- Digital Marketing

# ग्राफिक डिझाईनमधील करिअर

‘ग्राफिक डिझाईन’ हा शब्द बहुतेकांच्या परिचयाचा आहे. पण त्याचा अर्थ आणि व्यावसायिक व्याप्ती खूपच मोठी आहे. ‘ग्राफिक डिझाईन’ हा जरी एकच विषय असला तरी तो वरून मोहक वाटणाऱ्या अनेक कला क्षेत्रांचा पाया आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. जाहिरात, फोटोग्राफी, फोटो मिक्सिंग, प्रिंटिंग, डिजिटल प्रिंटिंग, वेब डिझाईन, ॲनिमेशन आदी क्षेत्रांचा पाया ‘ग्राफिक डिझाईन’ हाच आहे. मला चित्रकलेची आवड आहे म्हणून कोणी म्हणेल मला पेंटिंग किंवा बॅकग्राऊंड आर्टिस्ट म्हणूनच करियर करायचे आहे. मला जाहिरातींची आवड आहे. म्हणून कोणी म्हणेल मला स्वतःची जाहिरात एजन्सी सुरु करायची आहे. मला फोटोग्राफीची आवड आहे म्हणून कोणी म्हणेल मला माझा अद्यावत फोटो स्टुडिओ सुरु करायचा आहे. मला प्रिंटिंग आवडतं म्हणून कोणी म्हणेल मला प्रिंटिंग प्रेस सुरु करायची आहे किंवा प्रिंटिंगसाठी उत्तमोत्तम डिझाईन्स बनवायची आहेत. कोणी ॲनिमेशन आवडतं म्हणून म्हणेल मला ॲनिमेटर व्हायचंय. कलेच्या क्षेत्रात करियर करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाचा दृष्टीकोन असा वेगवेगळा असू शकतो. पण मी त्यासाठी सुरुवात कशी करायची? कोठून करायची? पैकी कोणते क्षेत्र माझ्यासाठी अधिक योग्य आणि फायद्याचे आहे? या गोष्टींचा उलगडा होणे अत्यंत गरजेचे आहे. काळानुसार कलेतील प्रत्येक क्षेत्राचे महत्व कमी–अधिक होत असते. म्हणून कदाचित आज उत्तम करियर वाटणारं क्षेत्र उद्या कमी महत्वाचे असू शकते. किंवा आज कमी महत्वाचं वाटणारं क्षेत्र भविष्यात फायद्याचंही होऊ शकतं. पण बदलत्या काळाच्या ओघात केंव्हाही फायद्याचंच असणारं ‘ग्राफिक डिझाईन ‘ हे एकमेव क्षेत्र आहे, कि जे आत्मसात केल्यानं भविष्यात करियर बद्दल कधी चिंता करीत बसावे लागणार नाही. नोकरीच्या मागे धावण्याची गरज भासणार नाही. अशा या सर्वसमावेशक कला क्षेत्रात ‘ग्राफिक डिझाईनर’ म्हणून करियर करू इच्छिणाऱ्यांसाठी संबंधित करियर क्षेत्रांची थोडक्यात माहिती सुरुवातीला इथे देत आहे. कि जेणेकरून करियरसाठी ‘ग्राफिक डिझाईन’चे क्षेत्र निवडताना मनात संभ्रम राहू नये. किंवा अभ्यासाला सुरुवात करण्यापूर्वी भविष्यात आपल्याला काय करायचे आहे. याची कल्पना असावी.

## ■ ग्राफिक डिझाईन आणि जाहिरात :

जाहिरात हा शब्द सर्वांच्याच परिचयाचा आहे. या क्षेत्राची व्याप्ती आणि उलाढाल खूप मोठी आहे. वर्तमानपत्रे आणि टीव्हीवरील जाहिराती तर सर्व परिचितच आहेत. अशा कल्पक आणि आकर्षक जाहिराती करण्यासाठी 'ग्राफिक डिझाईनर'च लागतो. जरी एका जाहिरातीमागे विज्युअलायझर, फोटोग्राफर, कॉपी रायटर, आर्ट डायरेक्टर आणि ग्राफिक डिझाईनर अशा अनेक वल्ली असल्या तरी सर्वच ठिकाणी अशा स्पेशलायझेशन केलेल्या व्यक्ती असतातच असे नाही. अर्थात एकटा 'ग्राफिक डिझाईनर' एखादी कल्पक जाहिरात बनवू शकतो. पण त्याला अशी जाहिरात बनविण्याचा क्रम ठाऊक असायला हवा. केवळ कोरल ड्रॉ / इलस्ट्रेटर किंवा फोटोशॉपसारखी सॉफ्टवेअर्स शिकून हे शक्य नसते. म्हणून ग्राफिक डिझाईन शिकताना जाहिरात आणि त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या इतर विषयांकडे लक्ष असावयास हवे. तसा जाहिरात हा एक स्वतंत्र विषय आहे. आणि त्या विषयीअभ्यासक्रमात सविस्तर माहिती आहेच. पण आत्ता कोर्सला प्रवेश घेताना पुढे तुम्ही जाहिराती बनविणार आहात याची कल्पना असावी म्हणून मी सांगतो आहे. ग्राफिक डिझाईन बनविताना आवश्यक आणि महत्वाची प्रोफेशनल सॉफ्टवेअर्स आपल्याला शिकायची आहेतच. पण त्याआधी या क्षेत्राची पार्श्वभूमी माहित असायला हवी. म्हणजे अभ्यास करताना उत्साह टिकून राहण्यासाठी याचा उपयोग होईल.

## ■ ग्राफिक डिझाईन आणि प्रिंटिंग :

कॉम्प्यूटरचा शोध लागण्याच्या अगोदर पासून प्रिंटिंग हे क्षेत्र आहे. कॉम्प्युटरमुळे प्रिंटिंग क्षेत्रात गती आली, परिपक्वता आली, प्रिंटींगचा दर्जा सुधारला आणि वेळ वाचला. परंतु प्रिंटिंगसाठी डिझाईन बनविण्याचे काम ग्राफिक डिझाईनरलाच करावे लागते. इथेही केवळ सॉफ्टवेअर शिकून चालत नाही. प्रिंटिंगसंदर्भातील सर्व ज्ञान आत्मसात करावे लागते. संपूर्ण प्रिंटिंग प्रोसेसची माहिती घ्यावी लागते. विविध प्रकारच्या प्रिंटिंगसाठी आवश्यक प्रोसेस समजाऊन घ्याव्या लागतात. आणि त्यानुसारच डिझाईन आर्टवर्क बनवावे लागते. या साठी सॉफ्टवेअर्स तीच असतात पण प्रिंटिंग टेक्नॉलॉजी माहित असेल तरच त्या सॉफ्टवेअर्समध्ये ग्राफिक डिझाईनर हे काम करू शकतो. केवळ सॉफ्टवेअर्स शिकून इथेही डिझाईन / आर्टवर्क बनविता येत नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. प्रिंटिंग क्षेत्रातसुद्धा क्रिएटिव्ह ग्राफिक डिझाईनर्सना प्रचंड मागणी आहे. पण प्रिंटिंग प्रोसेसची माहिती असणाऱ्यांनाच या क्षेत्रात अधिक संधी मिळते. बेसिक शिकल्यानंतर पुढे प्रोजेक्ट करताना या विषयी मी अधिक माहिती सांगणार आहे. तूर्तास साधारण कल्पना येण्यासाठी एवढे पुरे आहे.

## ■ ग्राफिक डिझाईन आणि फोटोग्राफी :

फोटोग्राफी माहित नाही असा कोणीही नाही. मोबाईलमध्ये कॅमेरा आल्यापासून तर प्रत्येकजण फोटोग्राफरच बनला आहे. पण इथेही केवळ कॅमेरा आहे म्हणून चांगले फोटो येतीलच असे नाही. मग तो कॅमेरा कितीही किमती असुदे. फोटोग्राफीचे तंत्र, लायटिंग आणि ग्राफिक डिझाईनचा अभ्यास असल्याशिवाय उतम फोटोग्राफी होऊ शकत नाही. फोटो काढताना केला जाणारा कॉम्पोझिशनचा विचार हाही ग्राफिक डिझाईनचाच भाग आहे. फंक्शन फोटोग्राफी असुदे, टेबल टॉप, लँडस्केप किंवा मॉडेलिंग फोटोग्राफी असुदे. उत्तम कॉम्पोझिशन आणि परफेक्ट लायटिंग असेल तरच फोटो चांगला वाटतो. जाहिरात / वेब / ॲनिमेशन क्षेत्रात फोटोग्राफीला अतिशय महत्व आहे. तेंव्हा ग्राफिक डिझाईनमध्ये फोटोग्राफी हा विषय खूप महत्वाचा आहे. पुढे तपशिलावर आपण त्याचा अभ्यास करणार आहोतच. पण सुरुवातीला ग्राफिक डिझाईनचा अभ्यास करताना फोटोग्राफी हा आपल्या अभ्यासाचा एक अतिशय महत्वाचा भाग आहे हे डोक्यात असुदे.

## ■ ग्राफिक डिझाईन आणि फोटो मिक्सिंग :

जाहिरात, प्रिंटिंग, वेब आणि ॲनिमेशनमध्ये फोटो मिक्सिंग तसेच स्पेशल इफेक्ट्समुळे अधिक जिवंतपणा आला. फोटोशॉपमध्ये फोटो मिक्सिंग हे तसे स्वतंत्र करिअरही होऊ शकते. केवळ याच तंत्राने लग्नाच्या फोटो अल्बममध्ये करिझ्मासारखे अल्बम लोकप्रिय झाले. आजमितीस ॲडव्हर्टायझिंग / वेब / ॲनिमेशनमध्ये कल्पकतेने हुबेहूब फोटो मिक्सिंग करणाऱ्या आर्टिस्टना खूपच मागणी आहे. त्यामुळे परफेक्ट फोटो मिक्सिंग टेक्निक्सचा अभ्यासही ग्राफिक डिझाईन मध्ये येतो. अर्थात हा अभ्यासही आपण करणार आहोत. साऱ्या गोष्टी एकदम शिकता येत नाहीत. ग्राफिक डिझाईन सारखा मोठा विषय शिकताना संबंधित इतर विषय एका ठराविक क्रमाने शिकायला हवेत. आपण क्रमाने हळू हळू साऱ्या गोष्टी शिकूया.

## ■ ग्राफिक डिझाईन आणि रंग :

रंग हा ग्राफिक डिझाईनचा अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक घटक आहे. रंग आणि रंगसंगतीचा प्रभाव दैनंदिन जीवनातही आपल्याला पहावयास मिळतो. जसे एखादे साधे खेळणे घ्या, किंवा फ्रीज / वॉशिंग मशीन किंवा कपडे खरेदी करा काहीही खरेदी करताना आपण रंग आणि रंगसंगती पाहूनच खरेदी करतो. अर्थात म्हणूनच ॲडव्हर्टायझिंग / वेब / ॲनिमेशनमध्ये रंग आणि रंगसंगतीला अधिक महत्व आहे. एखाद्या जाहिरातीमध्ये, पोस्टरमध्ये, वेब साईटमध्ये किंवा ॲनिमेशनसाठी साजेशी रंगसंगती निवडणे आणि वापरणे हे ग्राफिक डिझाईनमध्ये सोपे वाटणारे कठीण काम आहे. म्हणूनच ग्राफिक डिझाईन शिकताना आपण रंगांचा आणि रंगसंगतीचा आवर्जून अभ्यास करणार आहोत.

## ■ ग्राफिक डिझाईन आणि इंटरनेट :

जे मागेल ते देणारे आणि कितीही वापरले तरी न संपणारे असे 'खुल जा सीम सीम ' अर्थात इंटरनेट हे अतिशय प्रभावी मध्यम आज पुढे आले आहे. आणि त्यासाठी वेबसाईटस् बनविणे हे ग्राफिक डिझाईनरचेच काम आहे. आत्ता कुठे भारतात इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे वेब डिझाईन / ई ॲडव्हर्टायझिंग / ई मार्केटिंगसाठी ग्राफिक डिझाईनर्सना उद्या सुगीचे दिवस आहेत हे लिहून ठेवा. वेब डिझाईनिंग हे करिअरसाठी फार मोठे क्षेत्र आहे. कारण एका ठिकाणी बसून तुम्ही जगभरातील कामे करू शकता. पण इथेही इंटरनेट सर्फिंग किंवा एच.टी.एम.एल. किंवा सी.एस.एस. किंवा पी.एच.पी. / डॉटनेट सारखी केवळ सॉफ्टवेअर्स शिकून चालत नाही. ई ॲडव्हर्टायझिंग / ई मार्केटिंग समजून घेऊनच जशी गरज तसे वेब डिझाईन बनवावे लागते. कल्पकता, कलरचा अभ्यास इथेही लागतोच. वेब डिझाईनचा विषय विस्ताराने सांगायचा झाला तर तो खूप मोठा आहे. पुढे आपण वेब डिझाईन विस्ताराने शिकणार आहोतच. सारांश वेब डिझाईन हा ग्राफिक डिझाईनचाच एक भाग आहे हे लक्षात घ्या.

## ■ ग्राफिक डिझाईन आणि ॲनिमेशन :

ग्राफिक डिझाईन हा पाया असेल तर ॲनिमेशन हा त्यावरील एखादा सुंदर मजला म्हणायला काहीच हरकत नाही. कारण ॲनिमेशनने साऱ्या जगाला वेड लावले आहे. ॲनिमेशन म्हणजे ग्राफिक डिझाईन पेक्षा काहीतरी वेगळे आणि अवघड आहे असा समज मात्र अजिबात करून घेऊ नका. कारण ग्राफिक डिझाईन ही एक स्थिर फ्रेम असते आणि थोड्या थोड्या फरकाच्या अशा असंख्य फ्रेम्स् मिळून ॲनिमेशन तयार होते. म्हणजे बघा, एक ग्राफिक डिझाईन नाही कळले तर ॲनिमेशन काय शिकणार? ॲनिमेशनमध्ये हालचाल असते, आवाज असतो आणि जे प्रत्यक्षात कधी पाहायला मिळणार नाही असं अद्भुत आणि रम्य सर्व काही असते. साहजिकच ते शिकण्यासाठी विद्यार्थी उत्सुक असतो. ॲनिमेशनकडे पाहाताना एक सुंदर कलाकृती म्हणून आपण सहजच पाहतो. पण ते शिकण्याची इच्छा असणाऱ्यांनी त्या कलाकृती पाठीमागील पार्श्वभूमी विचारात घ्यावी. म्हणजे ग्राफिक डिझाईनपासून ॲनिमेशनपर्यंत पोहोचण्यासाठीचा खडतर प्रवास लक्षात येईल. फक्त स्क्रीनवर ॲनिमेशनच्या फायनल रेडी क्लिप्स पाहून एखाद्या संथेत प्रवेश घेणे सोपे आहे. पण ॲनिमेशन शिकणे ही त्यापेक्षा वेगळी गोष्ट आहे. ग्राफिक डिझाईन परफेक्ट शिकल्यानंतर ॲनिमेशन शिकणे फार अवघड गोष्ट नाही हे लक्षात घ्या.

■ **स्पेशलायझेशन :**

'ग्राफिक डिझाईन' हा एवढा विस्तृत विषय आहे कि त्या संबंधित सर्वच्या सर्व करिअर संधी एका वेळी सांगणे शक्य नाही. आणि ग्राफिक डिझाईन शिकणाऱ्याला संबंधित सर्वच क्षेत्रात करिअर करणेही शक्य नाही. शरीरामधील विविध अवयवांसाठी किंवा रोगांसाठी त्या त्या विषयातील जसे तज्ञ / स्पेशालिस्ट डॉक्टर असतात, अगदी तसेच ग्राफिक डिझाईन मधील प्रत्येक विभागामध्ये त्या त्या विभागातील तज्ञ ग्राफिक डिझाईनर असतात. म्हणूनच एखादा ग्राफिक डिझाईनर प्रि–प्रेस आर्टिस्ट म्हणून काम करतो किंवा एखादा ग्राफिक डिझाईनर वेब डिझाईनर असतो. एखादा कमर्शियल फोटोग्राफर असतो किंवा एखादा ॲनिमेटर असतो. यापैकी प्रत्येक विभागात अजूनही उपविभाग आहेत कि त्या प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र करियर करण्याची संधी असते. थोडक्यात ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे ज्या त्या विषयामध्ये उत्तम करिअर घडते पण त्यासाठी वर उल्लेख केलेल्या ग्राफिक डिझाईन संबंधित सर्व शाखांचा बेसिक अभ्यास अगोदर करावा आणि शेवटी त्यापैकी कोणत्या विषयात स्पेशलायझेशन करावे हे तुम्ही ठरवू शकता.



# ‘ग्राफिक डिझाईन स्किल्स’

(Graphic Design Skills)

ब्लॉगच्या माध्यमातून मी ‘ग्राफिक डिझाईन स्किल्स’ कोर्समधील लेसन्स प्रसिध्द करित असतो. त्याला विद्यार्थ्यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला आहे. पैकी काहीनी पुण्यात जुलैपासून सुरु होणाऱ्या बॅचसाठी प्रवेश घेतला आहे तर काहींनी जी.डी.स्किल्स कोर्सबद्दल आणि ग्राफिक डिझाईनमधील करिअरविषयक काही प्रश्नही विचारले आहेत. ग्राफिक डिझाईनसंबंधी विचारलेल्या सर्वसाधारण खालील प्रश्नांवर आधारित लिहिलेली ही शंका निरसनपर माहिती प्रवेश घेण्यापुर्वी तुमच्या ग्राफिक डिझाईनविषयी शंका दूर करण्यास नक्की मदत करेलच, शिवाय हा मराठी ‘ग्राफिक डिझाईन स्किल्स’ कोर्स जगातील इतर कोणत्याही इंग्रजीतील नुसत्या ग्राफिक डिझाईन कोर्सपेक्षा एकदम सोपा आणि वेगळा कसा आहे, हे सहजच लक्षात येईल.

- ग्राफिक डिझाईन आणि वेब डिझाईनमध्ये फरक काय ?
- लोगो डिझाईन कसे करतात ?
- आपण UI आणि UX डिझाईन शिकविता का ?
- मला वेब डिझाईन शिकायचे आहे. कोणता कोर्स करू ?
- प्रिंटिंगसाठी डिझाईन कसे बनवितात ?
- मला व्हिडीओ मेकिंगची आवड आहे. मी कोणता कोर्स करू ?
- कोर्स केल्यावर आपण नोकरीची हमी देता का ?
- डिजिटल मार्केटिंग म्हणजे काय ?
- सोशल नेटवर्किंग ॲडस कशा बनवितात ?
- कॅलिग्राफी आणि टायपोग्राफीमध्ये काय फरक आहे ?
- बॉक्स किंवा पौचसाठी डिझाईन कसे आणि कोणत्या सॉफ्टवेअरमध्ये बनवितात ?
- मोठ्या होर्डिंगचे डिझाईन कसे बनवितात ?

- फॅशन डिझाईन म्हणजे काय ?
- फ्लेक्स प्रिंटिंगसाठी डिझाईन कसे करतात ?
- फोटोग्राफीचा कोर्स कुठे करावा ?
- जाहिरातीचे डिझाईन कोणत्या सॉफ्टवेअरमध्ये बनते ?
- कोरल ड्रॉ आणि इलस्ट्रेटरमध्ये फरक काय ?
- पब्लिकेशनसाठी इनडिझाईन सॉफ्टवेअरच का वापरतात ? कोरल ड्रॉ का नाही ?
- कमर्शिअल आर्टिस्ट आणि ग्राफिक डिझाईनरमध्ये फरक काय ?
- गेमिंग डिझाईन म्हणजे काय ?
- आपण ॲनिमेशन शिकविता का ?
- व्ही.एफ.एक्स. म्हणजे नेमके काय ? इ. इ. इ.

विचारलेल्या वरील सर्व प्रश्नांच्या मुळाशी गेल्यावर थोडक्यात एकच उत्तर सापडते, ते म्हणजे 'ग्राफिक डिझाईन'. कारण असे कि, वरील सर्व प्रश्नांशी संबंधित ग्राफिक डिझाईन हा कॉमन आणि मूळ विषय आहे. प्रिंटिंग, पॅकेजिंग, वेब डिझाईन, टूडी / थ्रीडी ॲनिमेशन, गेमिंग, फॅशन डिझाईन, फोटोग्राफी, ज्वेलरी डिझाईन, व्हिडीओ मेकिंग, किंवा डिझाईन संबंधित कोणत्याही कोर्सला जा. तिथे ग्राफिक डिझाईन हा विषय असतोच. तो तुम्हाला किती आणि कसा समजतो यावर पुढे सारे अवलंबून असते. ग्राफिक डिझाईन हा केवळ विषय नाही तर ती एक दृष्टी आहे. विविध माध्यमातून तिला साकार करायचे असते. एवढे समजले तरी ग्राफिक डिझाईनसंबंधित इतर विषय समजायला वेळ लागत नाही आणि शंकाही निर्माण होणार नाहीत. नोकरीची हमी मिळते किंवा या क्षेत्रात पैसे भरपूर मिळतात अशा संकुचित वृत्तीने हे क्षेत्र निवडू नका. तुम्हाला खरंच कलेची आवड असेल आणि 'ग्राफिक डिझाईन स्किल्स' अवगत करुन स्वत:चा व्यवसाय सुरु करण्याची इच्छा असेल तर तुम्ही ग्राफिक डिझाईन क्षेत्र अवश्य निवडू शकता.

### सॉफ्टवेअर्स :

ग्राफिक डिझाईनमध्ये सॉफ्टवेअर्सचा खूपच गोंधळ आहे. ज्याला जे सॉफ्टवेअर येते, तो त्याचे कौतुक करतो. पण एकाच प्रकारचे काम करणाऱ्या दोन सॉफ्टवेअर्सपैकी कोणते सॉफ्टवेअर चांगले ? याचे उत्तर देणे कठीण आहे. मी म्हणेन ज्याला ग्राफिक डिझाईनची दृष्टी आहे, त्याला कोणतेही सॉफ्टवेअर चालते. तुम्हाला कोरल

ड्रॉ, इलस्ट्रेटर आणि फोटोशॉपसह बाकी इतर सॉफ्टवेअर्सही शिकायची आहेत. पण ही सॉफ्टवेअर्स ग्राफिक डिझाईनच्या दृष्टीने शिकणे हा महत्वाचा मुद्दा आहे, हे समजून घ्या म्हणजे वरील प्रश्नांची उत्तरे तुम्हाला आपोआपच मिळू लागतील. दहा सॉफ्टवेअर्स शिकलो पण काम एकही जमत नसेल तर ती सॉफ्टवेअर्स शिकून उपयोग काय? सॉफ्टवेअर कोणीही शिकू शकतो. त्यासाठी क्लासला जायचीही गरज नाही. घरबसल्या इंटरनेटवर तुम्ही कोणतेही सॉफ्टवेअर अगदी आरामात शिकू शकता. डेमो पाहून तेवढा टॉपिक समजू शकतो. पण स्किल्स मात्र नियमित प्रॅक्टिकल अभ्यासाने आत्मसात करायला लागतात. त्यासाठी नुसते सॉफ्टवेअर शिकविणाऱ्या क्लासमध्ये जाऊन चालणार नाही. तर 'सॉफ्टवेअर स्किल्स' शिकवितात का ते पाहून क्लास निवडला पाहिजे. आर्ट स्कूल्समध्ये ग्राफिक डिझाईनची दृष्टी निर्माण करण्याचे काम करतात. पण अभ्यासक्रमात ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी नसल्याने सॉफ्टवेअर स्किल्समध्ये विद्यार्थी कमी पडतात. ही वस्तुस्थिती आहे.

आणखी एका प्रश्नामध्ये UI आणि UX डिझाईनबद्दल शंका विचारली आहे. वेब डिझाईनमध्ये युझर इंटरफेस डिझाईन (UID) आणि युझर एक्स्पेरिअन्स डिझाईन (UXD) या दोन संकल्पना नव्याने उदयास आल्या आहेत. अर्थात या संकल्पना म्हणजे ग्राफिक डिझाईन / वेब डिझाईनच असते. पण नवीन शब्द प्रयोगामुळे समजण्यात गोंधळ होतो. कोणतीही गोष्ट दिसायला वरून साधी, सुंदर म्हणजेच युझर इंटरफेस डिझाईन आणि आतून सुटसुटीत, आरामदायी तांत्रिक रचना म्हणजे युझर एक्स्पेरिअन्स डिझाईन. समजून घ्यायचेच झाले तर गाडी दिसायला कशी वाटते म्हणजे युझर इंटरफेस डिझाईन आणि ज्यामुळे गाडी वापरायला कशी वाटते म्हणजे युझर एक्स्पेरिअन्स डिझाईन. म्हणजेच एखादे ॲप कॉम्प्युटर किंवा मोबाईलच्या स्क्रीनवर कसे दिसते म्हणजे युझर इंटरफेस डिझाईन आणि अंतर्गत फंक्शन / कोडिंग स्ट्रक्चरमुळे वापरायला कसे वाटते म्हणजे युझर एक्स्पेरिअन्स डिझाईन. एंड युझरच्या दृष्टीने इथे सारा विचार केला जातो.

कोणत्याही ग्राहकोपयोगी वस्तूच्या किंवा सेवेच्या जाहिराती, प्रिंटिंग किंवा पॅकेजिंगसाठी एंड युझरचाच विचार करून डिझाईन्स बनविली जातात. म्हणजे युझर इंटरफेस डिझाईन आणि युझर एक्स्पेरिअन्स डिझाईनमध्ये नवीन काहीच नाही. वेब डिझाईनसंदर्भातच या संकल्पना वापरतात.

फोटोग्राफी हे एक खूप मोठे क्षेत्र आहे, आणि फोटोग्राफी हासुद्धा ग्राफिक डिझाईनचाच एक विषय आहे.

ग्राफिक डिझाईनच्या विषयानुरुप फोटो शूट करणे हे एक फार मोठे कौशल्य असते. फोटो काढताना सेट करावी लागणारी फ्रेम म्हणजे ग्राफिक डिझाईनचाच एक भाग असतो. कांपोझिशन हा ग्राफिक डिझाईनमधील अत्यंत महत्वाचा विषय आहे. त्याचा उपयोग फोटोग्राफी करताना होतो. जाहिरातीसाठी टेबल टॉप प्रोडक्ट फोटोग्राफी, मॉडेलिंग फोटोग्राफी, आदी गोष्टींचे प्रॅक्टिकल ज्ञान ग्राफिक डिझाईनरला असावयास हवे. कारण जाहिरात डिझाईनमध्ये परफेक्ट फोटोग्राफीला खूप महत्व असते.

ग्राफिक डिझाईनसंबंधित कोणताही छोटा टॉपिक अगदी बारकाईने समजून घेऊन शिकावा लागतो. ज्ञान कणाकणानेच मिळवावे लागते. ग्राफिक डिझाईनमधील करिअर इतर क्षेत्रातील करिअरपेक्षा सोपे नक्कीच आहे. कारण इथे नोकरीच्या संधी भरपूर आहेत, आणि केवळ नोकरीवर अवलंबून न राहता स्वतःचा व्यवसायही सुरु करता येतो. ग्राफिक डिझाईनमध्ये तुम्ही कितीही शिकलात तरी पुढे शिकण्यासाठी खूप काही शिल्लक राहते. नवीन नवीन कलात्मक शिकण्यातली मजा जेवढी ग्राफिक डिझाईन क्षेत्रात आहे तेवढी इतर कोणत्याही क्षेत्रात नाही. म्हणूनच ग्राफिक डिझाईनर कधी बेकार राहत नाही. कारण प्रत्येक क्षेत्रात नेहमी त्याची गरज असतेच. हे ग्राफिक डिझाईनमधील करिअरचे वैशिष्ट्य आहे.

### ■ ग्राफिक डिझाईन म्हणजे काय ?

लाईन्स, शेप्स, कलर्स, इमेजिस आणि टेक्स्ट यांची आकर्षक रचना म्हणजे ग्राफिक डिझाईन असले तरी त्यापाठीमागे असलेल्या ऑब्झर्वेशन, थिंकिंग, स्केचिंग, इमॅजिनेशन, रायटिंग आदी गोष्टींना अधिक महत्व असते. म्हणून या गोष्टी आत्मसात करणे आम्ही महत्वाचे समजतो.

ग्राफिक डिझाईन म्हणजे कमर्शिअल आर्ट, ग्राफिक डिझाईन म्हणजे फाईन आर्ट, ग्राफिक डिझाईन म्हणजे कम्युनिकेशन आर्ट आणि ग्राफिक डिझाईन म्हणजेच अप्लाईड आर्ट. टूडी / थ्रीडी ॲनिमेशन म्हणजे हालतं बोलतं ग्राफिक डिझाईन आणि त्या ॲनिमेशनमधील प्रत्येक फ्रेम म्हणजे ग्राफिक डिझाईनच असते. कॉम्प्युटर आणि इंटरनेट नव्हते तेंव्हाही ग्राफिक डिझाईन होतंच. पेन्सिलने कोऱ्या पेपरवर ड्रॉ केलेली एक रेष किंवा ड्रॉ केलेला एक आकार आणि त्या आकारात रंग भरून काढलेले एक चित्र म्हणजे ग्राफिक डिझाईनच असते. एखाद्या आर्टिस्टने कॅनव्हासवर तैलरंगात केलेले पेंटिंग किंवा फोटोग्राफरने काढलेला फोटो म्हणजे सुद्धा

ग्राफिक डिझाईनच असते. सुंदर हस्ताक्षरात लिहिलेले एखादे वाक्य किंवा परिच्छेद अर्थात कॅलिग्राफी हा सुध्दा ग्राफिक डिझाईनचाच भाग आहे. टायपिंग तर सर्वांनाच माहित आहे. टायपिंगमध्ये भले कितीही आकर्षक आणि कॅलिग्राफीसदृष्य फॉन्टस असले तरीही मुळ कॅलिग्राफीचे महत्व आजही अबाधित आहे. आत्ताच्या इंटरनेट युगातील युझर इंटरफेस (UI) आणि युझर एक्स्पेरियन्स (UX) डिझाईन ज्याचा खूप गाजावाजा चाललाय तेही ग्राफिक डिझाईनच असते. थोडक्यात ज्याद्वारे एखादा संदेश दिला जातो अशी कोणतीही कलाकृती म्हणजे ग्राफिक डिझाईन. काळानुसार बदलेली संदेशवहनाची माध्यमे आणि त्या मध्यामानुरूप अर्थ समजण्याच्या दृष्टीने शब्द बदलले पण या साऱ्या शब्दांपाठीमागील मतितार्थ आणि संकल्पना एकच आहे, आणि ती म्हणजे 'ग्राफिक डिझाईन'. तेंव्हा ग्राफिक डिझाईनच्या विविध नावांमुळे आणि विविध माध्यमांमुळे गोंधळून जायचे कारण नाही.

तुम्ही थोडाफार विचार करू शकत असाल, जाता येता निरीक्षण करित असाल, कधीतरी पेन्सीलने कागदावर रेघोट्या मारल्या असतील, काही लिहिले असेल आणि जर रेड, ग्रीन, ब्लू, येलो, ऑरेंज, आदी कलर्स तुम्हाला ओळखता येत असतील तर तुम्ही परफेक्ट ग्राफिक डिझाईनर बनू शकता. स्वत:चा व्यवसाय सुरु करू शकता.

**■ ग्राफिक डिझाईनर – एक व्यावसायिक गरज :**

कोणत्याही व्यवसायाच्या / प्रोडक्टच्या ॲडव्हर्टायझिंग, मार्केटिंग आणि बिझनेस प्रमोशनसाठी अनेक प्रकारची ग्राफिक डिझाइन्स बनवावी लागतात. त्याला ब्रँडिंग असेही म्हणतात. त्यामध्ये लोगो डिझाईन, कार्पोरेट आय.डी., स्टेशनरी, ब्रोशर, कॅटलॉग डिझाईन, फोटोग्राफी, ईमेज एडिटिंग, स्टिकर, पोस्टर, होर्डिंग डिझाईन, बॉक्स पॅकेजिंग, पौच पॅकेजिंग, न्यूज पेपर ॲड, मॅगॅझिन ॲड, तसेच वेबसाईट डिझाईन, ब्लॉग डिझाईन, ईमेल मार्केटिंगसाठी ईमेल डिझाईन, सोशल नेटवर्क मार्केटिंगमध्ये फेसबुक, जी प्लस, ट्विटर, लिंक्ड इन आदी पोस्टसाठी ग्राफिक डिझाईन, युट्युब चॅनलसाठी ग्राफिक व्हिडीओ आदी अनेक गोष्टींचा समावेश होतो. या सर्व गोष्टी समजून घेऊन जो डिझाईन करतो त्याला आज खूपच मागणी आहे..

## ■ ग्राफिक डिझाईनमधील करिअर आणि प्रचलित शिक्षण :

करीयरच्या दृष्टीने जेंव्हा ग्राफिक डिझाईनचा विचार केला जातो तेंव्हा ग्राफिक डिझाईनमध्ये नेमके काय शिकायचे आणि शिकायला सुरुवात कोठून करायची हा प्रश्न पडतोच. ग्राफिक डिझाईन हा खूप मोठा आणि विस्तृत विषय आहे. म्हटले तर हा तसा खूप अवघड आणि समजून घेतला तर एकदम सोपा विषय आहे. ग्राफिक डिझाईनचे विविध प्रकार पाहिले कि त्याचे मूळ रूप नेमके कसे आहे ते कळत नाही. ग्राफिक डिझाईनमध्ये जाहिरात, फोटोग्राफी, प्रिंटिंग, पब्लिकेशन, वेब डिझाईन, ॲनिमेशन आणि या प्रत्येकामध्ये परत बरेच उपप्रकार पडतात. त्यापैकी कोणत्याही एका विषयात स्पेशलायझेशन करून करियरला संधी असते. ग्राफिक डिझाईन कुणी शिकावं? ग्राफिक डिझाईन शिकण्यासाठी काय पात्रता हवी? ग्राफिक डिझाईन शिकण्यासाठी चित्रकलेची गरज आहे का? ग्राफिक डिझाईन शिकल्यानंतर काय? या व अशा अनेक प्रश्नांची समाधानकारक उत्तरे हवी असतात. कोर्सला भरलेल्या फीच्या बदल्यात विद्यार्थ्याला काय मिळते? नुसते सर्टिफिकेट म्हणजे ज्ञानाची पावती किंवा कौशल्य विकास नव्हे.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आपली शिक्षण पद्धती. डिप्लोमा / डिग्रीचे सर्टिफिकेट म्हणजे ज्ञानाची पातळी समजली जाते. पण सत्य परिस्थिती पाहिली तर त्या डिप्लोमा / डिग्री सर्टिफिकेटचा आणि ज्ञानाचा दुरान्वये कुठेच संबंध दिसत नाही. शिक्षण ज्ञान मिळविण्यासाठी आहे कि सर्टिफिकेट मिळविण्यासाठी कळत नाही. अभ्यास पास होण्यासाठी आणि सर्टिफिकेट नोकरी मिळण्यासाठीच मिळवायचे असे जणू समीकरणच झाले आहे. मात्र व्यवसाय करावा असे फार कमी विद्यार्थ्यांना वाटते. असे मुळीच नाही कि व्यवसाय डिप्लोमा / डिग्री झाल्यानंतरच करता येतो. नोकरीसाठी डिप्लोमा / डिग्री ठीक आहे. पण व्यवसाय करण्यासाठी प्रॅक्टिकल व्यावसायिक ज्ञानाची गरज असते. आणि हेच आम्ही या 'ग्राफिक डिझाईन स्किल्स' कोर्समध्ये शिकवितो.

कोणत्याही शिक्षणाच्या बाबतीत बोलायचे झाले तर प्रचलित थेअरीबाज शिक्षण कुचकामी ठरले आहे. परीक्षा पध्दतीतर त्याहून चुकीची आहे. वर्षाच्या शेवटी घाईगडबडीत कसेबसे ओढून ताणून प्रोजेक्ट संम्मीशन करायचे म्हणजे पाट्या टाकण्यापेक्षा वेगळे काय आहे? एक गोष्ट दहा वेळा वाचून पाठ करण्यापेक्षा ती गोष्ट एकदा प्रत्यक्ष करून पाहिली कि जास्त समजते. म्हणून आम्ही म्हणतो वाचून पाठ करण्यापेक्षा प्रत्यक्ष करून

बघा. प्रचलित थेअरीबाज शिक्षण म्हणजे पुस्तक वाचून पोहायला शिकल्यासारखे किंवा एखाद्या खाद्यपदार्थाचे वर्णन वाचून पोट भरल्यासारखे आहे. म्हणून आम्ही 100 टक्के प्रॅक्टिकलला महत्व देतो. आज मार्केटमध्ये जी टेक्नॉलॉजी वापरुन ग्राफिक डिझाईन्स बनवितात तीच टेक्नॉलॉजी आम्ही शिकवितो.

## ■ 100 टक्के नोकरीची नव्हे तर ज्ञानाची हमी :

100 टक्के नोकरीची हमी ही एक खूप आकर्षक पण बुद्धीला न पटणारी संकल्पना कशी रूढ झाली आहे माहित नाही. खरे तर 100 टक्के ज्ञानाची हमी पाहिजे. कारण 100 टक्के ज्ञान असेल तरच तुम्ही नोकरी किंवा व्यवसाय काहीही करू शकता. म्हणून शिकणाऱ्याने 100 टक्के नोकरीच्या अमिषाला बळी न पडता १०० टक्के ज्ञानाची हमी मागितली पाहिजे. या मताचे आम्ही आहोत. म्हणूनच विद्यार्थ्याला आम्ही १०० टक्के ज्ञानाची आणि 100 टक्के पैसे कमवायची गॅरंटी नक्कीच देतो.

## ■ ग्राफिक डिझाईन आणि इंटरनेट :

इंटरनेटवर ग्राफिक डिझाईनबद्दल इंग्रजीमध्ये खूप काही वाचायला मिळतं, खूप काही मोफत शिकायला मिळतं आणि नवनवीन संकल्पना पाहायला मिळतात. विशेष म्हणजे ग्राफिक डिझाईन करताना इंटरनेटचा रेफरन्ससाठी खूपच उपयोग होतो. इंटरनेटमुळे ग्राफिक डिझाईनर बनणे अधिक सोपे झाले आहे. बहुतांश कोर्सेसच्या नोटस आणि व्हिडीओज इंटरनेटवरूनच डाउनलोड करून विद्यार्थ्याला दिल्या जातात. इंटरनेट म्हणजे कोणताही विषय शिकण्याचे उघड गुपित आहे. इंटरनेट सर्वांनाच माहित आहे. त्याचा उपयोग ग्राफिक डिझाईनसाठी कसा होतो याचाही या कोर्समध्ये आम्ही आवर्जुन समावेश केला आहे.

## ■ ग्राफिक डिझाईन एवढं सोपं कसं असू शकतं ?

ग्राफिक डिझाईन ही सहज समजण्यासारखी एक अत्यंत सोपी आणि साधी संकल्पना आहे. ग्राफिक डिझाईन म्हणजे फार काहीतरी वेगळे आहे. अद्भुत आहे, अवघड आहे असे मुळीच नाही. ग्राफिक डिझाईन करण्यासाठी स्वतः आर्टिस्ट असावे लागते असेही नाही. इंटरनेटच्या युगात जरी आता सारे एकदम सोपे आणि सुटसुटीत झाले असले तरीही गुंतागुंत वाढली आहे. कारण काय खरे, काय खोटे, कोणते बरोबर आणि कोणते चूक हे समजून घेताना संभ्रम होतो. ग्राफिक डिझाईनच्या बाबतीतही असेच झाले आहे. जाहिरात आणि जाहिरातीच्या विविध माध्यमांमुळे ग्राफिक डिझाईनचे रोज नव–नवीन प्रकार पाहायला मिळतात. प्रमोशनसाठी प्रत्येक व्यावसायिकाला आज ग्राफिक डिझाईनची गरज आहे. त्यामुळे जसजसा उद्योग वाढतो आहे, तसतसे ग्राफिक

डिझाईनचे महत्व वाढतच आहे. ग्राफिक डिझाईनरला नेहमीच काही तरी नवीन करावे लागते. माध्यमाला अनुसरून असे क्रिएटिव्ह आर्टवर्क बनविताना वेगवेगळ्या पद्धती असतात. त्यामध्ये ऑफसेट प्रिंटिंगला डिझाईन आर्टवर्क करण्याची पद्धत वेगळी, बुक पब्लिकेशनसाठी आर्ट–वर्क करण्याची पद्धत वेगळी तसेच स्क्रिन प्रिंटिंगसाठी डिझाईन आर्टवर्क करण्याची पद्धत वेगळी असते. डिजिटल प्रिंटिंग, पॅकेजिंगमध्ये फ्लेक्झो किंवा रोटो–ग्रेव्हीयरसाठीही डिझाईन आर्टवर्क करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या असतात. इंटरनेटसाठी स्टॅटिक आणि डायनॅमिक वेबसाईट डिझाईन बनवताना तर HTML, CSS, JS, PHP, MySQL, अशा विविध प्रकारच्या प्रॉग्रॅमिंग माध्यमातून जावे लागते. रिस्पॉन्सिव्ह वेबसाईटसाठी पुन्हा बूट–स्ट्रॅपसारख्या प्लॅटफॉर्मचा आधार घ्यावा लागतो. ब्लॉगिंगसाठी कधी ब्लॉगर तर कधी वर्ड–प्रेस वापरावे लागते. ऑनलाईन जाहिरातीसाठी डिझाईन्स बनविणे हा पुन्हा वेगळा प्रकार असतो. फेसबुक, लिंक्डइन, ट्विटर आदी सोशल नेटवर्क प्रमोशनसाठी पेज डिझाइन्स बनविणे ही सुद्धा एक कसरत असते. ऑनलाईन मार्केटिंगमध्ये ईमेलसाठीसुध्दा विशिष्ट प्रकारे डिझाईन बनवावे लागते. अशा अनेक प्रकारच्या ग्राफिक डिझाईनची कामे करताना ग्राफिक डिझाईनरला वेगवेगळी सॉफ्टवेअर्स वापरावी लागतात. मग कोणत्या डिझाईनसाठी नेमके कोणते सॉफ्टवेअर वापरायचे? हा पुन्हा पेचात टाकणारा प्रश्न असतो. ग्राफिक डिझाईनची व्याप्ती आणि ग्राफिक डिझाईनरच्या कामाची लिस्ट अजूनही खूप मोठी आहे. इथे एका वेळी ते सर्व सांगणे शक्य नाही.

विविध क्षेत्रातील ग्राफिक डिझाईनचे अनेक प्रकारचे प्रोजेक्ट आर्टेकचा विद्यार्थी एकटा कसा करू शकतो? हे आजवर इतरांना न उलगडलेले कोडे आहे.

अनेक माध्यमे, अनेक डिझाईन्सचे प्रकार, डिझाईन करण्याच्या अनेक पद्धती तरीही ग्राफिक डिझाईन ही एक अत्यंत सोपी आणि साधी संकल्पना आहे आणि तुम्हीसुद्धा ग्राफिक डिझाईनर बनू शकता हे आम्ही ठामपणे सांगतो कारण हा नुसता ग्राफिक डिझाईन कोर्स नाही तर हा 'ग्राफिक डिझाईन स्किल्स' कोर्स आहे.

### ■ ह्या कोर्ससाठी काय पात्रता हवी?

हा कोर्स पूर्ण करुन स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी नवीन शिकण्याची प्रबळ इच्छाशक्ती आणि ठाम निर्णयक्षमता या दोनच पात्रता असायला हव्यात. पास, नापास किंवा मार्क्सची टक्केवारी आम्हाला महत्वाची नाही. किंबहुना पडलेल्या मार्क्सवर विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करणे आम्हाला पटत नाही.

तुम्हाला ड्रॉइंगची आवड असेल आणि जाहिरात / प्रिंटिंग / वेब क्षेत्रात ग्राफिक डिझाईनर बनायची इच्छा असेल. शिक्षण जेमतेम असेल किंवा पदवीधर असुनही नोकरी मिळत नसेल. तुम्ही प्रोग्रॅमर असाल पण ग्राफिक डिझाईन जमत नसेल. तुम्ही जी.डी.आर्ट असाल आणि कल्पनेतील डिझाईनचे विज्युअल बनविता येत नसेल. वर्षानुवर्षे शिकुनही अजून बेकार असाल, तर हा कोर्स तुमच्यासाठीच आहे किंवा इतर काहीही शिकत असाल तर शिकत शिकत शिकण्यासारखा हा कोर्स तुमच्यासाठीही आहे.

तुम्ही आर्टिस्ट असाल, तुम्ही फोटोग्राफर असाल, प्रिंटर असाल, जाहिरातदार असाल आणि ग्राफिक डिझाईनमधील आणखी काही स्पेशल शिकायची इच्छा असेल तर हा कोर्स तुमच्यासाठीसुध्दा आहे.

प्रवेशासाठी ना वयाची अट, ना शिक्षणाची अट. कारण ग्राफिक डिझाईन ही सहज समजण्यासारखी एक अत्यंत सोपी आणि साधी संकल्पना आहे.

ग्राफिक डिझाईन स्किल्स शिकून वर्षात ग्राफिक डिझाईनर म्हणून स्वत:चा व्यवसाय सुरु करण्याचे ठरवा आणि निश्चिंतपणे प्रवेश घ्या. कोर्स पुर्ण होईपर्यंत तुमच्यात व्यवसाय सुरु करण्य़ाची पात्रता आणि आत्मविश्वास निर्माण करण्याची जबाबदारी आमची.

**जाहिरातदार, फोटोग्राफर, प्रिंटर्स, नोकरदार आणि व्यावसायिकांसाठी**

## प्रोफेशनल शॉर्ट-टर्म कोर्सेस उपलब्ध!

**कोरल ड्रॉ, फोटोशॉप, इलस्ट्रेटर, इनडिझाईन, वर्डप्रेस, ऑनलाईन ॲडव्हर्टायझिंग आणि डिजिटल मार्केटिंग**

रेग्युलर बॅच : सायं ७ ते ९ (सोम, बुध आणि शुक्र)
विकेंड बॅच : रविवार ११ ते २

# ग्राफिक डिझाईन स्किल्स
# इन
# ॲडव्हर्टायझिंग ॲण्ड प्रिंटिंग
## (अभ्यासक्रम)

# Graphic Design Skills
# in
# Advcertising & Printing
## ( Syllabus )

# 1 Syllabus structure at a glance



- Observation for Graphic Design
- Sketching for Graphic Design
- Thinking for Graphic Design
- Writing for Graphic Design
- Ideas / Themes in Graphic Design
- Purpose of Graphic Design
- Elements of Graphic Design
- Medias of Graphic Design
- Composition in Graphic Design
- Defination of Graphic Design
- Fields in Graphic Design
- Soft Skills for Graphic Design
- Live Graphic Design Projects
- Your own Business Preparation

# 2 Course Objectives and Goals



Create visual communication print and web materials for clients such as Logos, Print Brochure, Posters, Online Marketing Materials and Advertising. Work with clients to identify business objectives, create strategies and implement them with a range of Design, Advertising, Printing, Branding and Marketing Projects.

# 3 Soft Skills : Corel Draw












- Understanding Vector Graphics
- Draw Line and Shapes
- Edit Line and Shapes
- Understanding Object
- Understanding Colours
- Basic Transformations
- Create Perfect Shapes
- Advance Transformations
- Layout & Composition Tools
- Create Various Vector Effects
- Advance Colour Study
- Object Drawing and Painting

... and much more in depth.

# 4 Soft Skills : Photoshop



- Understanding Raster Graphics
- Understanding Pixels
- Understanding Image
- Highlight, Mid tone and shadows
- Understanding Layers
- Image Size and Resolution
- Brushes, Styles and Textures
- Using Filters for effects
- Colour Adjustment
- Image Retouching / Finishing
- Image Editing for Print Projects
- Image Editing for Web Projects
- One Click Desoign Techniques

... and more in depth.

# 5 Photography

- Understanding Camera & Lights
- Basic Photography Techniques
- Camera and Light Setting
- Frame Compsition
- Portrait Photography
- Table top Photography





# 6 Design Artwork Process

- Create idea for Graphic Design Project
- Shoot Photos for Graphic Design Project
- Decide Title and Copy Matter for Graphic Design
- Draw Composition and Layout Sketches
- Select and Use Colour harmony for Graphic Design
- Create Rough Visuals of Design using Corel Draw and Photoshop
- Paper Types and Sizes
- Making Final Print Ready Artwork File





# 7 Branding : Live Study Projects

- Logo Design
- Corporate ID (V Card, Letterhead & Envelope)
- Stationery ( Invoice, Receipt etc. )
- Wedding or Invitation or Greeting Card
- Newspaper Ad
- Magazine Ad
- Brochure
- Leaflet (Flyer) or Folder
- Calendar Design
- Sign Board
- Hoarding Design
- Sticker
- Book Publication Design
- Box Packaging
- Pouch Packaging
- Product Photography
- Wedding Album Photo Mixing

and more Promotional Projects...



# 8 Your Own Business Preparation

- Decide Your Own Business Name
- Create Your Own Company Logo
- Design Your Company V Card, Letter Head & Envelope
- Design Handbill or Brochure for promotion (Print / eCopy)
- Create Work Portfolio (print / e-copy)
- Find Customers Offline / Online
- Write and send Letters About your Graphic Design Services.




## Your Business Starts...

... and we will always with you!

# ग्राफिक डिझाईन स्किल्स
# इन
# वेब अँड डिजिटल मार्केटिंग
## (अभ्यासक्रम)

# Graphic Design Skills
# in
# Web & Digital Marketing
## ( Syllabus )

# 1 100 % प्रॅक्टिकल वेब डिझाईन कोर्स

## नो थेअरी, नो कोडिंग. डायरेक्ट लाईव्ह प्रॅक्टिकल...

ग्राफिक डिझाईन स्किल्स इन ॲडव्हर्टायझिंग अँड प्रिंटिंग कोर्स पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी ग्राफिक डिझाईन स्किल्स इन वेब अँड डिजिटल मार्केटिंग हा फक्त ३ महिन्याचा प्रॅक्टिकल कोर्स आम्ही सुरू केला आहे. नोकरी मिळविताना किंवा व्यवसाय सुरु करताना जाहिरात, प्रिंट, पब्लिकेशन, पॅकेजिंग डिझाईन प्रोजेक्टस् बरोबरच त्याला वेब डिझाइन, ऑनलाईन प्रमोशन, सोशल आणि डिजिटल मार्किटिंगचेही ज्ञान असायला हवे. ही काळाची गरज ओळखूनच फक्त त्यांच्यासाठी कमी वेळेत परफेक्ट वेब डिझाईन शिकविणारा हा अभ्यासक्रम तयार केला आहे. वेब डिझाईनसाठीचा बराचसा अभ्यास प्रिंट डिझाईन कोर्समध्ये कव्हर झाला असल्यामुळे फक्त ३ महिन्यात विद्यार्थी वेब डिझाईन अगदी आरामात शिकतो.

वेब डिझाईनचा प्रचलित रटाळ थेअरीबाज, आऊटडेटेड सिलॅबस विद्यार्थ्यांच्या डोक्यावरुन जातो. आणि म्हणूनच 100 टक्के प्रॅक्टिकलवर आधारित आवश्यक तोच सिलॅबस आम्ही तयार केला. जेणेकरुन कस्टमरला हवी तशी बेब साईट करुन देऊन विद्यार्थ्याला डिजिटल मार्केटिंगही करता आले पाहिजे. असे आम्हाला वाटते. दृष्टीक्षेपात कोर्सचा सिलॅबस पाहिल्यास आपल्या ते सहजच लक्षात येईल.

# 2 Syllabus structure at a glance

- Domain Registration & Control Panel
- Asign Server and Manage Hosting Control Panel
- Create Corporate Email Id for Business.
- Create Web Design / Layout in Photoshop
- Create or Edit Images for Web Design
- Create Static Web Site Using HTML, CSS and JS
- Deploy Website on Server Using FTP Client.
- Create Responsive Website using Bootstrap
- Create Dynamic Website in Wordpress
- Create Blog for Business Promotion
- Create Facebook, LinkedIn and Twitter Pages
- Design and Activate Email Newsletter,
- Design and Publish Google Ads
- Design and Publish Facebook Ads.

# 3 कोर्स फी, प्रवेश प्रक्रिया आणि बॅचेस

■ **जी.डी.स्किल्स ईन ॲडव्हर्टायझिंग अँड प्रिंटिंग :** कालावधी : 1 वर्ष
कोर्स फी रु. 60,000/- (प्रवेश घेतेवेळी रु. 25,000/- आणि दरमहा रु. 5,000/-)
(फी एकदम भरल्यास रु. 50,000/-)

■ **जी.डी.स्किल्स ईन वेब अँड डिजिटल मार्केटिंग :** कालावधी : 3 महिने
कोर्स फी रु. 30,000/- (प्रवेश घेतेवेळी रु. 15,000/- आणि दरमहा रु. 7,500/-)
(फी एकदम भरल्यास रु. 25,000/-)

■ **4 बॅचेस :** (सोम. ते शुक्र) स. 8 ते 10, 11 ते 1, दु. 3 ते 5 आणि सा. 6 ते 8

■ **प्रवेश मर्यादा :** 40

■ **प्रवेशासाठी कागदपत्रे :** 10वी / 12वी मार्कलिस्ट, आधार कार्ड आणि पासपोर्ट साईज फोटो (झेरॉक्स किंवा सॉफ्ट कॉपी)

प्रथम येणाऱ्यांना प्रथम प्रवेश. (इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड / एटीडी / जी.डी.आर्ट झालेल्यांना किंवा शिकत असणाऱ्यांना प्रथम प्राधान्य.)

■ **कोर्स मटेरियल :**
लॅपटॉप, कॅमेरा, स्केच बुक, पेन्सिल, एक नोटबुक, डेली डायरी आणि पेन.

ऑनलाईन स्टुडंट रजिस्ट्रेशन : **https://artekdigital.in/register**

प्रवेश फॉर्म डाऊनलोड लिंक : **https://artekdigital.in/admission-form.pdf**

A man who works with his hands
is a labourer;
A man who works with his hands and his brain
is a craftsman;
but
A man who works with his hands and his brain and his heart
is an Artist

# कला शिकण्याची कला!

ARTEK DIGITAL
Halward Business Center, Office No. 5, ITI Road,
Near Crossword, Aundh, Pune - 411007, Maharashtra, (India)
Phone : +91 9975769299 Email : gd@artekdigital.in Website : https://artekdigital.in